# विश्वबंधुत्व

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे द्वैमासिक

डिसेंबर २०१९ – जानेवारी २०२०

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

प्रकाशक
अध्यक्ष
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०२०　　डिसेंबर २०१९ – जानेवारी २०२०　　अंक २ ला

## अनुक्रमणिका

| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय – बंधु (ॲड.) संजय दि. पोटे | ३ |
| २. | कर्म – ले. – ॲनी बेझंट<br>अनुवाद – बंधु श. धु. बुरसे, पुणे. | ५ |
| ३. | थिऑसॉफिस्टची कर्तव्ये | १२ |
| ४. | दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ<br>प्रेषक – बंधु नितीन अभ्यंकर, पुणे. | १४ |
| ५. | जे. कृष्णमूर्ती, थिऑसॉफी आणि थिऑसॉफिकल सोसायटी<br>अनुवाद – बंधु डॉ. विनायक मिराशी | २४ |
| ६. | लॉज वार्ता | २५ |

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.**

**वार्षिक वर्गणी : रु. १००/–**

**(आजीव सदस्य – १५ वर्षे – रु. १०००/–)**

# संपादकीय

प्रिय बंधु-भगिनी,

नवीन वर्ष, सन २०२०, आपणास सुख व समृद्धीचे जावो ही शुभकामना. संपणाऱ्या आणि उगवणाऱ्या वर्षाला जोडणारा उपयुक्त कार्यक्रम अशी ख्याती थिऑसॉफिकल सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय अधिवेशनाला लाभलेली आहे. दि. २९ डिसेंबर २०१९ ते ५ जानेवारी २०२० पर्यंतचे थिऑसॉफिकल सोसायटीचे १४४ वे अधिवेशन वाराणसी येथे संपन्न होत आहे. किंबहुना हा अंक वाचनात येईपर्यंत हे अधिवेशन यशस्वीपणे पार पडलेले असेल. "**दैविक बीजाचे संगोपन**" (Nurturing the Devine Seed) ह्या विचारसुत्रावर आधारीत विविध विचार प्रस्तुतीकरण, व्याखाने, चर्चासत्रे व उपक्रमाने परिपूर्ण अशा या अधिवेशनाला मराठी थिऑसॉफिकलचे बहुसंख्य पदाधिकारी व सभासद हजर राहिलेत हे वाखाणण्यासारखे आहे.

ह्याच अनुषंगाने नमूद करावेसे वाटते की, म. थि. फे. अंतर्गत कार्यरत असणारे लॉज हे त्यांचे वर्धापन/स्थापना दिवस देखील उत्साहाने साजरे करीत असतात. थिऑसॉफिकल शिकवणीवर आधारीत व्याख्याने व अभ्यासवर्ग तसेच काही समाजोपयोगी उपक्रम ह्या निमित्ताने आयोजित करण्यात येतात. अकोला येथील लॉजने ११८ वा वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहाने साजरा केला. पुणे येथील लॉजचा वर्धापन दिन जानेवारी २०२० मध्ये संपन्न होत आहे. पुणे लॉज येथील ग्रंथालयात थिऑसॉफिकल विषयासंबंधित ८००० हून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. येथे T.S., E.S. आणि T.O.S. चे कार्यक्रम नियमितपणे सुरू असतात.

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनने एक नवीन संकल्पना प्रस्तुत केली आहे - Theosophical Resource Centre. ह्याद्वारे थिऑसॉफिकल शिकवणीचे आदानप्रदान करणे व थिऑसॉफीचा प्रचार व प्रसार करण्यास योग्य दिशा मिळेल. ह्याद्वारे थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासदांच्या सुप्त ज्ञान व कलागुणांना प्रोत्साहन देणे अपेक्षित आहे. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सभासदांच्या केवळ संख्यावाढीवर भर न देता सभासदांमध्ये थिऑसॉफिकल शिकवणीच्या गुणवत्तावाढीवर भर देण्यात येईल.

भारतामध्ये कार्यरत असणाऱ्या थिऑसॉफिकल फेडरेशनसाठी मागीलवर्षी प्रमाणेच ह्या वर्षीदेखील काही 'स्मार्ट गोल्स' निश्चित करण्यात आले आहेत. मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनला देण्यात आलेले काही ठळक गोल्स असे – **विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी थिऑसॉफिकल संबंधित विषयांवर निबंधस्पर्धा/वक्तृत्वस्पर्धा, नवीन सभासदांसाठी चर्चासत्रे, सभासदांसाठी अभ्यासवर्ग, आंतर–फेडरेशन परिषद, भोवाली (उत्तराखंड) येथे दि. २३ मे ते २६ मे २०२० दरम्यान अभ्यासवर्ग व परिसंवाद इत्यादी.** प्रत्येक लॉजला ही माहिती पाठविण्यात आली आहे. एक विशेष बाब अशी की ह्या वर्षापासून फेडरेशनकेड लॉजेसने पाठवायची सभासदांची यादी व वर्गणीची अंतीम तारीख ३१ जुलै केलेली आहे. पूर्वी ही तारीख ३१ ऑगस्ट होती.

थिऑसॉफीसाठी मराठीमध्ये ब्रह्मविद्या हाच शब्द प्रचलित आहे. ब्रह्मविद्या हे सनातन ज्ञान आहे. पदार्थ, जीवन व चैतन्य यांचे परस्पर नाते आणि त्यापलिकडील अस्तित्व समजून घेण्यासाठी ब्रह्मविद्येचे अध्ययन अगत्याचे आहे. ह्या अध्ययनानेच अनाकलनीय असे निसर्गनियम आणि आपल्या अंतर्यामी असलेल्या सुप्त शक्ती यांचे आकलन आणि प्रकटीकरण होऊ लागते. ब्रह्मविद्येच्या अभ्यासकांमध्ये स्वावलंबन आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. अभ्यासक भविष्याविषयी सदैव आशावादी असतो. त्याला कळते की मानवाचा आत्मा अमर आहे आणि त्याच्या विकासाला आणि वैभवाला कोणत्याही मर्यादा नाहीत. असो.

नववर्षाच्या पुनःश्च शुभेच्छा.

आपला बंधु
संजय दि. पोटे (ॲड.)
अध्यक्ष, म.थि.फे., पुणे.

**ईश्वराच्या उत्क्रांतीच्या आराखड्याला पूरक अशा कृती म्हणजे 'योग्य कृती' होय आणि अशा कृती आपल्याकडून रोजच्या जीवनात प्रत्येक क्षणाला घडतात ना याचे काटेकोरपणे आणि निःपक्षपणे निरिक्षण करणे म्हणजेच अध्यात्म असे म्हणता येईल.**

# कर्म

## लेखक – ॲनी बेझंट
## अनुवादक – बंधु श. धुं. बुरसे, पुणे

(पुर्नमुद्रित लेख)

दि. सेंट्रल हिंदू मॅगेझीन या मासिकामध्ये विद्यार्थ्यांनी 'कर्म' या विषयावर विचारलेल्या प्रश्नांना डॉ. ॲनी बेझंट यांनी सोप्या भाषेत उत्तरे दिली आहेत. त्यातील निवडक प्रश्नोत्तरे मराठी वाचकांसाठी पुढे देत आहोत --

**प्रश्न :** आपली प्रत्येक कृती ही आपले विचार व सभोवतालची परिस्थिती यावर अवलंबून असते. विचार हे आपल्या मेंदूवर व सभोवतालची परिस्थिती ही आपल्या जन्मावर अवलंबून असते. आपल्या पसंतीवर ह्या गोष्टी अवलंबून नसतात. मग आपण त्याने बद्ध नाही का?

**उत्तर :** ह्या जन्मात आपल्याला जो मेंदू जन्मतः मिळाला आहे तो आपण गतजन्मात जसे विचार जोपासले असतील त्यावर अवलंबून असतो; त्यामुळे तो आपलीच निर्मिती आहे. त्याचप्रमाणे आपल्या सभोवतालची परिस्थिती ही आपल्या गतजन्मातील कृतीवर अवलंबून असते. **आपणच आपल्याला बद्ध करीत असतो व आपणच आपल्याला मुक्त करू शकतो.** प्रत्येक नवीन जन्म हा मागील जन्मावर अवलंबून असतो. परंतु आपल्याला जेव्हा हे ज्ञान होईल तेव्हा आपणच स्वतःला मागील जोखडातून एक एक करून सोडवू व भविष्यातील जास्त स्वातंत्र्याची तयारी करू.

**प्रश्न :** जे विधीलिखित असते ते मानवी जीवनप्रवाहावर कितपत परिणाम करते हे जाणून घेण्यास मी इच्छुक आहे.

**उत्तर :** विधीलिखित हा शब्द बहुधा एखाद्या बाह्य श्रेष्ठ शक्तीने सर्व घटनांचे नियोजन करणे अशा अर्थाने वापरला जातो आणि त्याबाबत बराच वैचारिक गोंधळ आढळतो. त्याचे कारण निसर्गात कार्यरत असणाऱ्या शक्तींचा अभ्यास लोक करीत नाहीत. विश्वाच्या उत्क्रांतीचा सर्वसाधारण आराखडा ईश्वराने निर्धारित केलेला असतो. त्याने या नाट्याची संहिता लिहिलेली असून त्याचा प्रयोग विश्वात होत असतो. त्यातील पात्रांनी – जे ईश्वराचेच भाग असतात – स्वतःची भूमिका निवडलेली आहे. ही त्यांची निवड एखाद्या इच्छेवर अवलंबून

नसून त्यांनी सतत जोपासलेल्या इच्छा, विचार व कृती यावर अवलंबून असते. अशा रितीने **स्वतःच्या इच्छा, विचार व कृती यांनी माणूस आपले स्वतःचे विधीलिखित घडवत असतो. अनुभवातून आलेले शहाणपण, त्याच्यापेक्षा श्रेष्ठ असणाऱ्यांचा सल्ला व त्याचे स्वतःचे प्रयत्न यामुळे स्वतःचे विधिलिखित बदलू शकतो.** अर्थात त्याने भूतकाळात जे विधिलिखित घडविले असेल त्यामध्ये आत्ता वर्तमानकाळात तो तत्काळ बदल घडवू शकणार नाही. ज्याप्रमाणे एखाद्या शेतकऱ्याने अगोदरच जर तांदूळ पेरले असतील तर तो आत्ता सातूच्या पिकाची अपेक्षा करू शकणार नाही. जर त्याने गतकाळात रागीट स्वभाव घडविला असेल तर तत्काळ तो शांत स्वभावाची अपेक्षा धरू शकणार नाही; परंतु योग्य त्या इच्छा व विचार यामुळे तो हळू हळू आपला विधिलिखित असणारा रागीट स्वभाव बदलून शांत स्वभाव मिळवू शकतो. **जेव्हा तुम्हाला कर्माचे नियम समजतील, तेव्हा तुम्ही स्वतः स्वतःचे विधिलिखित निवडाल व त्याप्रमाणे ते घडवाल.** तुमच्या स्वतःच्या छोट्या योजनेला त्या भव्य योजनेत जागा असेल. ज्याप्रमाणे ईश्वर आपल्या भव्य योजनेचे विधिलिखित ठरवत असतो, त्याप्रमाणे तुम्ही सुद्धा स्वतःच्या लहान योजनेचे विधिलिखित ठरवू शकता.

**प्रश्न** : मनुष्याला त्याच्या शरीराची ठेवण पूर्वकर्मानुसार मिळते का?

**उत्तर** : अर्थात त्याप्रमाणेच मिळते. समजा एखाद्या माणसाने विचारशक्तीचा वापर करून आपल्या वैचारिक क्षमतांचा विकास केला असेल तर पुढील जन्मात या वैचारिक क्षमता योग्य रितीने व्यक्त होण्यास लागणारा सुघटित व सुविकसित असा मेंदू त्याला प्राप्त होतो. शरीराची रचना ही येणाऱ्या जीवात्म्याच्या गरजेनुसार घडते व त्यामुळे तो जीवात्मा त्याच्या गरजेनुसार शरीराचे साधन वापरू शकतो. दुष्ट विचार व वासना, क्रौर्य व वासनांधता यामुळे आत्यंतिक परिस्थितीमध्ये विकलांग शरीर घडते, परंतु इतर सर्व उदाहरणांमध्ये मिळणारे शरीर हे अशक्त किंवा कुरूप असते. कर्मनियमांच्या बाहेर काहीही नसते.

**प्रश्न** : जर एखाद्या माणसाने चांगले किंवा वाईट कृत्य केले तर त्याचे फळ त्याला या जन्मात मिळते का मृत्यूनंतर?

**उत्तर** : ही गोष्ट त्याने केलेल्या कृत्याच्या स्वरूपावर अवलंबून असते. काही कृत्ये या जन्मात तत्काळ फलित होतात. अशा कृत्यांचा प्रभाव

चारित्र्यावर तत्काळ उमटतो व तो दीर्घकाळ राहतो. सवयी या मृत्यूनंतरसुद्धा राहतात आणि वाईट सवयींचा त्रास मृत्यूनंतरसुद्धा होतो. दीर्घकाळ राहणारा परिणाम हा इच्छा व विचार यामुळे होतो.

**प्रश्न** : एक माणूस सुखी असतो तर दुसरा दुःखी असतो असे का? जर हे कर्मावर अवलंबून असेल तर सुरवातीला देवाने सर्वांना एकसारखी अक्कल दिली असूनसुद्धा एक जण चांगल्याच्या मागे जातो व दुसरा वाईटाच्या मागे जातो असे का?

**उत्तर** : यातील पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, वाईटाच्या मागोमाग दुःखे येतात तर चांगल्याच्या मागोमाग सुखे येतात. वाईट हे उत्क्रांतीच्या नियमाच्या विरूद्ध असल्यामुळे घर्षण निर्माण करते व त्याचे फळ दुःखाने मिळते याउलट चांगले जे असते ते उत्क्रांतीच्या नियमाशी सुसंगत असते व त्यामुळे सुख मिळते. प्रत्येक जीवात्मा हा सुरवातीला अज्ञानाने वेढलेला असतो. प्रत्येक जीवात्मा आपली सुरवात निसर्ग नियमांशी सुसंगत किंवा विरूद्ध वर्तणूक करून व त्यामधून मिळणारे सुख व दुःखाचे अनुभव गोळा करून करीत असतो. त्याच्या अनेक जन्मामधील एखाद्याच तुटक जन्मामध्ये पाहिले असता एक जीवात्मा सुख उपभोगताना दिसतो तर दुसरा दुःखी दिसतो. परंतु **सर्व जन्मांकडे व्यापक दृष्टीने पाहिले असता प्रत्येक जीवात्मा हा काही काळ सुखी तर काही काळ दुःखी दिसतो.**

**प्रश्न** : जर आपण ईश्वरपरायण असे आयुष्य जगत असू तर आपल्या सर्व गरजा आपल्या प्रयत्नांशिवाय ईश्वराकडून भागविल्या जातील का?

**उत्तर : मनुष्याला सर्व गोष्टी त्याच्या पात्रतेनुसार मिळतात.** जर तो आपले सर्व आयुष्य इतरांच्या निःस्वार्थी सेवेमध्ये घालवित असेल तरच त्याच्या सर्व गरजा भागविल्या जातील अन्यथा नाही. जर त्याचे ईश्वरपरायणत्व म्हणजे केवळ एक 'उदात्त स्वार्थीपणा' असेल व तो केवळ स्वतःच्या मुक्तीसाठी व मोक्षासाठी प्रयत्न करीत असेल, विश्वातील इतरांसाठी बेफिकीर असेल, तर निसर्ग, जे परमेश्वराचे व्यक्त रूप आहे, तो त्या मनुष्याबद्दलसुद्धा बेफिकीर असेल.

**प्रश्न** : जगामध्ये सज्जन माणसे सुद्धा दुःख का भोगीत असतात?

**उत्तर** : सर्व सज्जन माणसे दुःखी कष्टी नसतात. काही सज्जन माणसे ही अतिशय शांत व आनंदी आयुष्य जगत असतात. परंतु कित्येक दुःख भोगीत

असतात कारण ते आपली प्रगती वेगाने करीत असतात व त्यांच्या मुक्तीच्या मार्गात येणारी जुनी देणी ते फेडून टाकीत असतात.

**प्रश्न** : जगामध्ये सज्जन माणसे सुद्धा जाणवण्याइतपत दुःख भोगताना का दिसतात? जर ती प्रायश्चित्त भोगीत असतील तर त्यांनी मागे केलेल्या चुकांचे प्रतिबिंब त्यांच्या आत्ताच्या चारित्र्यामध्ये का दिसत नाही?

**उत्तर** : दुःख हे प्रत्येक बाबतीत प्रायश्चित्त म्हणून नसते. कित्येकवेळा तो शुद्धीचा एक भाग असतो. जगाच्या कर्माचा स्वखुशीने स्वीकारलेला एक भाग असतो. दुःख हे जरी प्रायश्चित्त म्हणून असेल तरी सुद्धा ते भयंकर कृत्यामुळे असेल असे नाही. एखाद्या वाईट माणसाला त्याच्या व्यसनांमुळे, दारूच्या आहारी गेल्यामुळे किंवा वासनांधतेने भोगाव्या लागणाऱ्या दुःखापेक्षा एखाद्या सज्जन माणसाला एखादी चुकीची इच्छा किंवा किरकोळ चूकसुद्धा जास्त दुःखकारक ठरते. त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे सर्वसाधारण माणसे ही ज्या दृष्टीने दुःखाकडे बघतात त्या दृष्टीने अतिशय प्रगत व्यक्ती दुःखाकडे बघत नाहीत. त्यांच्या दृष्टीने भौतिक वस्तूंच्या आकर्षणापासून दूर ठेवणाऱ्या दुःखाचे ते स्वागतच करतात. भौतिक वस्तू त्यांच्यापासून हिरावून घेतली जाणे हे बहुतेक वेळा त्यांच्यावर दैवी जीवनाचा वर्षाव होण्याची पूर्वतयारी असते.

**प्रश्न** : जे लोक स्पष्टपणे निर्दोष व तरूण आहेत, त्यांना देव मृत्यूची शिक्षा का देतो?

**उत्तर : देव कोणालाही कशाचीही शिक्षा देत नाही.** सुसंवादाचे काही नियम आहेत. त्यांचे पालन केले असता एकंदरीत सुख प्राप्त होते. लोक जेव्हा स्वार्थाने प्रेरित होऊन त्यांच्या विरोधात जातात तेव्हा त्यांना ओरखडले जाते व ते तक्रार करतात की देवाने त्यांना आपत्तीची शिक्षा केली. समजा वडिलांनी मुलास सांगितले, 'मुला जर तू जास्त मिठाई खाल्लीस तर तू आजारी पडशील.' तरीसुद्धा मुलगा जास्त मिठाई खाण्याचे सोडत नाही. परिणामी त्याचे पोट दुखू लागते. आता सांगा की पोटदुखीची शिक्षा त्याला वडिलांनी दिली का मुलाच्या स्वतःच्या हावरेपणाने? जेव्हा लोक एका आयुष्यात त्यांच्या स्वतःच्या वाट्याची व इतरांच्या वाट्याचीही मिठाई आधाशीपणे खातात तेव्हा दुसऱ्या आयुष्यात त्यांना दुःख भोगावे लागते. ''**जसे माणूस पेरतो तसेच उगवते.**''

**प्रश्न** : समजा एखाद्या पापी मनुष्याला पश्चाताप झाला आणि त्याने देवाकडे क्षमायाचना केली तर त्याला माफ केले जाते का?

**उत्तर** : ''माफ करणे'' म्हणजे आपणास काय अभिप्रेत आहे? जर आपणास असे वाटत असेल की त्याने केलेल्या दुष्कृत्यांच्या परिणामांपासून त्याची सुटका होईल तर नाही, त्याची सुटका होणार नाही. परंतु त्याला होणारा पश्चाताप हे नवीन कर्म आहे. ते त्याने केलेल्या पापाच्या विरोधात उभे राहिल. त्याने केलेल्या दुष्कृत्यांचा जो सर्वात वाईट परिणाम म्हणजे त्याचे घसरणारे चारित्र्य आहे; त्याच्या विरोधात त्याच्या पश्चात्तापाची शक्ती काम करेल. त्याचे हे पापाकडे पाठ फिरविणे व देवाकडे तोंड वळविणे आहे ते एखाद्या मनुष्याने भिंतीकडील तोंड फिरवून सूर्याकडे पाहण्यासारखे आहे. सूर्यप्रकाशाची उब त्याला मिळेल व तो उल्हसित होईल. असाच उबदारपणा व उल्हसितपणा पापी मनुष्य पश्चात्तापामुळे अनुभवतो व त्याला तो 'माफी मिळणे' समजतो. त्यानंतर त्याच्या दुष्कृत्यांमुळे होणारे दुःख आनंदाने भोगतो व त्यामुळे त्याला नवीन ज्ञान प्राप्त होते.

**प्रश्न** : जर कर्माचे नियम अनिवार्य असतील तर दुःखाचे निवारण होण्यासाठी किंवा सुखाची प्राप्ती होण्यासाठी केली जाणारी प्रार्थना निरूपयोगीच म्हणायची?

**उत्तर** : हा प्रश्न नेहमी विचारला जातो व त्याचा उद्‌भव कर्मासंबंधीच्या अस्पष्ट कल्पनांमुळे होतो. **कर्म हे भूतकाळाचा परिणाम म्हणून असते. ते सतत दृढ होत जाते किंवा कमकुवत होत जाते. इच्छा, विचार व कृती यांच्या असंख्य धाग्याने ते बनते.** त्या धाग्यांपैकी काही कर्माच्या बाजूने किंवा काही त्याच्या विरोधी कार्यरत असतात. कोणत्याही नेमक्या उदाहरणाचे उत्तर हे त्यामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मावर अवलंबून आहे. जर कर्म हे कोणत्याही एका दिशेने जोरदारपणे कार्यरत असेल तर आत्ता ताबडतोब आपण त्याच्या विरूद्ध इच्छा, विचार व कृती यांचा जोर लावून त्या कर्माचा परिणाम घालवू शकत नाही. जर कर्म एखाद्या दिशेने कार्यरत आहे पण त्याचा जोर फार नाही तर आपण त्याच्या विरूद्ध इच्छा, विचार व कृती यांचा जोर लावून त्या कर्माच्या परिणामावर मात करू शकतो. अशा वेळी प्रार्थना ही कर्माचा काटा एका बाजूला फार झुकला नसेल तर उपयोगी ठरते. कारण कर्माचा एक घटक जी तीव्र इच्छा असते ती काम करते.

**प्रश्न** : जर या जन्मातील विचार, वासना व कृती यामुळे भविष्यातील जन्मामधील विधीलिखित घडत असेल तर जन्मानंतर काही मिनिटांमध्ये मृत्यू

पावणाऱ्या बालकांचे विधीलिखित काय आहे?

**उत्तर** : गतकाळातील एखादे न संपलेले कार्य असेल हे उघड आहे. अशा बालकाने मागील एखाद्या क्षुल्लक गुन्ह्याचे पापक्षालन केले नसेल व त्याचे शिल्लक असलेले कर्म तसेच काहीही बदल न होता राहिले असेल तर अशा वेळी जीवात्मा लवकरच नवीन देह धारण करतो.

**प्रश्न** : गतजन्मामधील आपल्या एखाद्या कृतीमुळे जर आपल्यावर संकट कोसळणार असेल तर ते टाळता येईल का?

**उत्तर** : अशा प्रश्नाला निश्चित असे उत्तर नाही. जर असे दुर्दैवी संकट आपल्या प्रारब्ध कर्मात असेल तर ते टाळता येणार नाही. जर त्याची कारणे पूर्णत्वास गेली नसतील तर त्या विरुद्ध समतोल साधणारी शक्ती निर्माण करून त्याची तीव्रता कमी करता येईल. अशी विशेष उदाहरणे जर तुम्हाला समजून घ्यायची असतील तर कर्माच्या सिद्धांतामधील तत्वे तुम्ही अभ्यासली पाहिजेत. तुम्ही थिऑसॉफिकल सोसायटीचे क्रमिक पुस्तक 'कर्म' वाचा. 'दि एन्शंट विस्डम' या पुस्तकामधील कर्म या विषयावरील प्रकरण वाचा. 'सनातन धर्म' (प्रश्नावली) मधील प्राथमिक सिद्धांत वाचा. त्याचबरोबर सनातन धर्म क्रमिक पुस्तके – प्राथमिक व उच्च (एलेमेंटरी ॲण्ड ॲडव्हान्स) वाचा.

**प्रश्न** : एक मनुष्य पापी आयुष्य जगत आहे व तो पापक्षालनासाठी देवाची प्रार्थना करतो, तर दुसरा एक मनुष्य सद्गुणी आयुष्य जगत आहे व तो देवाची कसलीच प्रार्थना करत नाही. तर पहिल्याची प्रार्थना व दुसऱ्याची कृती यांचे फळ काय?

**उत्तर** : क्षमायाचनेसाठी केल्या जाणाऱ्या प्रार्थनेला जर जीवनातील बदलाची जोड नसेल तर अशी प्रार्थना निष्फळ व ढोंगी आहे. जर आपणास क्षमा याचा अर्थ चूक करणारा त्याने केलेल्या कृत्यांच्या परिणामापासून सुटेल असा अभिप्रेत असेल तर काटेकोरपणे सांगावयाचे झाले तर **पापाला क्षमा नाही. नियमांपासून कोणाचीही सुटका नाही.** ज्याप्रमाणे बैलाच्या पावलामागे गाडीचे चाक धावते त्याप्रमाणे **पापामागे दुःख निश्चितपणे धावते.** ज्याप्रमाणे पहिल्या मनुष्याला त्याच्या पापाचे फळ मिळेल त्याचप्रमाणे सद्गुणी मनुष्याला त्याच्या सत्कृत्याचे फळ निश्चितपणे मिळेल. त्याचे चारित्र्य जास्त भव्य होईल. सद्गुणांकडील त्याचा कल घट्ट होत जाईल. प्रेम व आनंद त्याचेकडे आपोआप येईल. प्रार्थनेचा म्हणजे स्वतःचे हृदय शिवात्म्याच्या सूर्यकिरणांसाठी

उघड करणे याचा अभाव वरील परिणामांमध्ये अडथळा निर्माण करणार नाही परंतु शिवात्म्याचा एक भाग असण्याची जाणीव यापासून मिळणाऱ्या आनंदाला व शांतीला तो मुकेल.

**प्रश्न** : देव आपली दुःखे कमी का करीत नाही?

**उत्तर** : आपल्या दुःखांचे कारण आपणच असतो. जेव्हा आपण मूर्खासारख्या चुकीच्या गोष्टी करतो तेव्हा आपण दुःखे भोगतो. **अनुभव हाच बलिष्ठ व शहाणे होण्याचा उपाय आहे.** आपण एक भव्य व्यापकतेचा भाग आहोत आणि या व्यापकतेशी आपण सुसंवादी असल्याशिवाय सुखी होऊ शकणार नाही. आपण सुसंवादी नाही हे वेदना आपल्याला सांगत असतात व आपणाला योग्य मार्गावर येण्यासाठी इशारा देत असतात.

**प्रश्न** : पुण्य व पाप यांची नेमकी व्याख्या काय?

**उत्तर** : **पुण्य म्हणजे सद्‌गुण.** हा शब्द सत्कृत्यांचे फळ म्हणून वापरला जातो. जर मनुष्याने सत्कृत्य केले असेल तर कर्मानुसार त्याला सुख मिळते व हे सुख त्याच्या सद्‌गुणामुळे मिळाले असे म्हटले जाते. मृत्यूनंतर त्याला मिळणारे स्वर्गसुख हे त्याच्या सद्‌गुणाचे फळ, पुण्य म्हटले जाते. त्याच्या सत्कृत्याचे फळ, त्याचे पुण्य जेव्हा संपते तेव्हा त्याचे स्वर्गसुखही संपते व तो पुन्हा पृथ्वीवर येतो. जेव्हा लोक त्याच्या सत्कृत्याच्या फळाकडे दुर्लक्ष करतात तेव्हा ते पुण्यसंचयाची पर्वा करत नाहीत. **पाप म्हणजे दुष्कृत्य व ते सद्‌गुणाच्या विरुद्ध दुर्गुण म्हणून ओळखले जाते. दुःख हे पापाचे कर्मफळ आहे.**

**प्रश्न** : गतकर्मानुसार अंत्यज ब्राह्मण म्हणून किंवा ब्राह्मण अंत्यज म्हणून जन्मास येईल का?

**उत्तर** : अर्थात जर अंत्यज मनुष्याने ब्राह्मणाचे गुण जोपासले तर तो ब्राह्मण म्हणून जन्मास येईल व ब्राह्मण मनुष्याने जर उत्क्रांती मधील सुरवातीचे दुर्गुण जोपासले तर तो अंत्यज म्हणून किंवा परदेशात त्यासारख्या निम्न स्तरावर जन्म घेईल. याप्रमाणे मद्रास प्रांतातील कित्येक ब्राह्मण हे युरोपियन द्राक्षापासूनची मदिरा, मद्य व मादक पदार्थ यांचे सेवन करतात. त्यांना नक्कीच येथे अंत्यजाचा किंवा इतरत्र निम्न स्तरावरचा जन्म मिळेल.

**प्रश्न** : जर एखादा चांगला अंत्यज मरण पावला तर तो पुढील जन्म कोणत्या जातीत घेईल?

**उत्तर** : तो त्याच्या सद्‌गुणांस अनुसरून योग्य त्या जातीत इतरांसारखा जन्म घेईल. जर त्याची आध्यात्मिक उन्नती अगोदर झाली असेल जेणे करून तो त्याच्या बांधवांचा उद्धार करू शकेल किंवा त्याच्या गतजन्मातील एखाद्या घोर अपराधाची शिक्षा त्याला मिळाली असेल. उदाहरणार्थ – कदाचित ब्राह्मण असताना त्याला अध्यात्माचा खूप गर्व झाला असेल, त्याला नम्रता, विनय शिकविण्यासाठी अंत्यजाचा देह मिळाला असेल.

**प्रश्न** : अयोग्य ब्राह्मणाला दिलेल्या भिक्षेचे फळ काय म्हणून मिळावे?

**उत्तर** : प्रथमतः त्याचे फळ काहीच मिळणार नाही. दुसरे म्हणजे कदाचित त्याचे फळ वाईटही असेल – मनू व वसिष्ठ यांनी त्यास बंदी घातली आहे. तिसरे म्हणजे जर त्याला काही चांगले फळ मिळाले तर त्याचे कारण भिक्षा देताना जे प्रेम व श्रद्धा असते ते होय; कारण सर्व त्याग, भिक्षा ही अखेरीस शिवात्म्यास वाहिले जाते. तो ज्या स्वरूपात प्रकट झाला असेल त्या स्वरूपास नाही. त्याग या विषयावरील 'द एन्शंट विस्डम'मधील प्रकरण पहा व धर्म या विषयासाठी त्या नावाने प्रसिद्ध झालेली तीन व्याख्याने वाचावीत.

★★★

## थिऑसॉफिस्टची कर्तव्ये

१. या चळवळीसारख्या महान कार्यात आपले सर्वच सहकारी सुस्वभावी, प्रज्ञा असणारे, व्यवहार–चतुर किंवा धैर्यशील असावेत अशी अपेक्षा कोणीही ठेऊ नये. **आत्मनिग्रहाचे पहिले लक्षण म्हणजे जेव्हा आपण परस्पर भिन्न प्रकारच्या व स्वभावांच्या सोबत्यांशी वागताना कनवाळूपणा व संयम दाखवणे.** जेव्हा कोणी अपेक्षा करतो की इतरांना तेच आवडले पाहिजे. जे त्याला आवडते व तो जे करतो तेच दुसऱ्यांनी करावे तेव्हा आपली अधोगती झाली आहे हेच दाखवित असतो व त्याचे वरीलप्रकारे वागणे ही त्याची खूण आहे. – महात्मा मौर्य

1. In such a great work as this movement no one should expect to find his associates all congenial, intuitive, prudent or courageous. One of the first proofs of self-

mastery is when one shows that he can be kind and forbearing and genial with companions of the most dissimilar characters and temperaments. One of the strongest signs of retrogression is when one shows that he likes and act as he acts. - Master M.

२. नित्य कोणते व अनित्य कोणते, सत्य आणि असत्य यामधील भेद तू कसा जाणशील? फक्त आत्मविकासातून. आत्मविकास कसा साधावा? प्रथम आत्मवंचनेच्या कारणांपासून स्वतःचे काळजीपूर्वक रक्षण करुन. तू हे पुढील प्रकारानी करु शकतोस. प्रत्येक दिवशी नेहेमीकरता ठरवलेला तोच एक किंवा एकाहून अधिक तास एकांतात, आत्मपरिक्षणात, लिहिण्यात, वाचनात, स्वतःच्या हेतुंच्या शुद्धिकरणात, अभ्यासात आपले दोष सुधारण्यात व तुझ्या बाह्य जगातील कामाची आखणी करण्यात खर्च कर. हळूहळू तुझी दृष्टि निवळेल, तुझ्या दृष्टिला सर्व गोष्टी स्पष्ट दिसू लागतील. धुके विरु लागल्याचे तुला दिसेल. तुझ्या अंतःशक्ती अधिक बलवत्तर होतील व आमच्याबद्दलचे तुझे आकर्षण अधिक जोर धरेल. शंकांचे समाधान होऊन त्यांची जागा पक्की खात्री घेईल.

– कुथूमी

2. How can you know the real from, the unreal, the true from the false? Only by self-development. How get that? By first carefully guarding yourself against the causes of self-deception. And this you can do by spending a certain fixed hour or hours each day all alone in self-contemplation, writing, reading, the purification of your motives, the study and correction of your faults, the planning of your work in the external life .... Little by little your sight will clear, and you will find the mists pass away, your interior faculties strengthen, your attraction toward us gain force, and certainly replace doubts.

**- K. H.**

# दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ

**प्रेषक – नितीन अभ्यंकर, पूना लॉज.**

**(मी पूना लॉजमध्ये जुलै २०१९ पासून महिन्यातून एकदा या विषयावर बोलत आहे. तेच व्याख्यान येथे क्रमशः देत आहे.)**

दामोदर यांनी तिबेटला जाण्यासाठी अड्यार सोडल्यानंतर त्यांचा पुढचा प्रवास कसा झाला, ते कसे तिबेटकडे गेले, त्यांना वाटेत कोण कोण भेटले, त्यांना काय काय अडचणींना तोंड द्यावे लागले इत्यादिची माहिती दामोदर यांच्या डायरीत आपणास मिळते. एच. एस. ओ. 'ओल्ड डायरी लीव्हस्' मध्ये डी. के. यांचा तिबेटच्या दिशेचा अंतिम प्रवास, दामोदर यांची रोजनिशी याबद्दल सविस्तर लिहितात. त्याचा सारांश आपण आता पाहू या.

"Damodar is one of the best known characters in the early Indian history of the T.S." दामोदर यांनी २३ फेब्रुवारी १८८५ ला तिबेटकडे जाण्यासाठी शेवटचे अड्यार सोडले आणि 'एस. एस. क्लॅन ग्रँट' या आगबोटीने कलकत्त्याकडे प्रयाण केले. तेथून दार्जिलिंगमार्गे तिबेटला जाण्याचे त्यांचे नियोजन होते. अर्थात प्रवासाचे सर्व काही ते त्यांच्या गुरुदेव किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या सुचनांनुसारच करत होते. या त्यांच्या प्रवासाबद्दल आणि यानंतर दामोदर यांचे काय झाले इत्यादिबद्दल खात्रीशीरपणे माहिती सांगू शकणाऱ्या हिमालयाच्या या बाजूला ४ व्यक्ती होत्या. एच्.पी.बी., टी. सुब्बाराव, बनारसच्या माँजी आणि एच.एस.ओ. लिहितात की चौथ्या व्यक्तीचे नाव सांगण्याची मला परवानगी नाही पण या व्यक्तीला हिमालयाच्या दोन्हीकडे ओळखतात आणि ही व्यक्ती हिंदुस्थान व तिबेट यादरम्यान बरेचदा प्रवास करत असते.

जेव्हा दामोदर यांनी अड्यार सोडले तेव्हा त्यांची तब्येत बरीच ढासळलेली होती. हॅमरेज झाले होते. ते अतिशय कृश झाले होते. कामाच्या अतिव्यापामुळे ते खूपच नाजुक झाले होते. तरी त्यांना आशा होती की या चवथ्या व्यक्तीबरोबर ते ल्हासाला जातील. या प्रवासात जेव्हा दामोदर दार्जिलिंगहून पुढे गेले तेव्हा अनेक अस्वस्थ करणाऱ्या अफवा उठत होत्या. जसे की पर्वत ओलांडून जायच्या प्रयत्नात ते गायब झाले. जुलैच्या पहिल्या आठवड्यात चुंबोई, सिक्कीम येथून असेही वृत्त पोचले होते की पूर्णतः कडक व ताठ झालेले डी.

के. यांचे मृत शरीर बर्फात सापडले आणि तेथून जवळच त्यांचे कपडे सापडले. अनेकांनी, विशेषतः ज्यांचा श्वेतसिद्धसंघाच्या अस्तित्वावर विश्वास नव्हता, जे थिऑसॉफिस्टांच्या निंदेची एकही संधी सोडत नव्हते अशा लोकांनी या वृत्तांवर विश्वास ठेवला. एका उमद्या तरूणाला त्याच्या जीवनाचा त्याग करण्यासाठी आम्ही उद्युक्त केले असे आरोप आमच्यावर झाले. परंतु या आधीही व नंतरही जी अनेक संकटे सोसायटीवर आली, जे आरोप झाले, ते सर्व काही आम्ही संयमाने झेलले, सहन केले व कालाच्या ओघात त्यांच्यावर मात केली. तेच आम्ही दामोदरच्या बाबतीत दूषित वातावरणात केले.

डी. के. यांचे थिऑसॉफीसाठीचे योगदान खूपच बहुमुल्य होते आणि एच्.एस्.ओ. व इतरांना खात्रीपूर्वक वाटत होते की दामोदर परत येतील आणि महात्म्यांच्या कार्यात महत्वाची भूमिका बजावतील. दार्जिलिंग पासून पुढे सिक्काममधून सीमेपर्यंत किंवा त्याहीपुढे दामोदर यांच्याबरोबर जे कुली गेले होते, त्यांनी दामोदर यांचे जादा सामान आणि डायरी परत आणली. एच्.एस्.ओ. यांनी या हमालांच्या प्रमुखाबरोबर दीर्घ संभाषण केले. दामोदर यांची डायरी हा सर्व दृष्टीने एक अतिशय महत्वाचा दस्तऐवज आहे. एच्.एस्.ओ. त्यातले मुख्य व महत्वाचे मुद्दे तारखेनुसार सविस्तरपणे मांडतात. **तर दामोदर यांची डायरी काय म्हणते याचा आता आपण धावता आढावा घेऊ या.**

२३/०२/१८८५ – कलकत्त्याकडे प्रयाण. सी–सीकनेसचा त्रास झाला नाही.

२५/०२/१८८५ – जहाजावर एका डॉक्टरची मैत्री झाली. एक चांगले सद्गृहस्थ पण तत्वज्ञानात फारशी गती नाही. पण तशी क्षमता आहे.

२७/०२/१८८५ – दुपारी ४ ला कलकत्त्याला पोचलो व नरेंद्रबाबूंची भेट झाली. आजारपणामुळे हवापालटाची गरज आहे असे सांगितले. (अर्थात मूळ अंतिम उद्देश सांगितला नाही – एच्.एस्.ओ.) कलकत्ता येथे अनेक मित्रमंडळींची भेट झाली. स्थानिक शाखांना भेटी दिल्या पण या शाखांची स्थिती काही फारशी चांगली नाही. येथून बहरामपूरकडे प्रयाण. बहारमपूर येथे नोबीन चॅटर्जी यांच्या नेतृत्वाखाली एक सर्वोत्तम शाखा आहे. तीन दिवसांनी ते जमालपूरला गेले. कलकत्ता आणि बहरामपूर येथे प्रत्येकी एक एक प्रसंग असा घडला की ज्यांना डी. के. आधी माहीत नव्हते त्यांना डी. के. यांना पाहिल्यावर

लक्षात आले की याच व्यक्तीला त्यांनी आधी स्वप्नात पाहिले होते. एच्.एस्.ओ. म्हणतात की मलाही असे अनुभव बरेचदा आले आहेत. जमालपूर येथे सदस्यांनी अनेक मार्मिक व महत्वाचे प्रश्न दामोदरना विचारले. त्यातून या सदस्यांचे जीवनाच्या मूलभूत प्रश्नांबाबत किती सखोल विचार होते हे लक्षात येते.

०८/०३/१८८५ - बनारसला पोचलो व माँजींच्या आश्रमात गेलो. सकाळ व संध्याकाळ माँजींबरोबर दीर्घ चर्चा, संवाद झाला. माँजींनी टी. सुब्बारावबद्दल अशा गोष्टी सांगितल्या ज्या सुब्बाराव यांनी मला नुकत्याच खाजगीत सांगितल्या होत्या. त्या बाबाजींबद्दलही बोलल्या जे फक्त मला आणि उपासिकेलाच माहित होते. (दामोदर एच्.पी.बीं.चा कायम 'उपासिका' असा उल्लेख करत.) याशिवाय बऱ्याच इतर विस्मयकारक गोष्टी माँजींनी मला सांगितल्या.

०९/०३/१८८५ - माँजींनी अड्यार मुख्यालयातील महात्म्यांच्या प्रतिमांच्या (portraits) संदर्भात अनेक आश्चर्यकारक गोष्टी सांगितल्या. टी. सुब्बाराव यांच्या गुरूदेवांबद्दल सांगितले.

१०/०३/१८८५ - माँजींनी तयार गेलेले औषध मी घेण्यास सुरवात केली. एच्.पी.बीं.चा मृत्यू, त्यानंतर त्यांचा होणारा पुढचा जन्म याबद्दल काही भविष्य त्यांनी सांगितले. (अर्थात यातले काहीच नंतर खरे झाले नाही.) (एच्.एस्.ओ. पण या माँजींना काही वेळा भेटले होते. माँजींनी त्यांनाही एच्.पी.बी. आणि सोसायटी याबद्दल बरीच भविष्यवाणी केली होती. पण हे सर्व काहीच प्रत्यक्षात घडले नाही. पण एकंदरीत असे वाटते की दामोदरबद्दल त्यांनी जे सांगितले ते बरेचसे त्याप्रमाणे घडले.)

११/०३/१८८५ - माँजींबरोबर संभाषण पुढे चालू. दुपारी बनारस लॉजच्या सभेला उपस्थित राहिलो.

१२/०३/१८८५ - माँजींची स्वतःच्या ध्यानसाधनेसाठी वेगळी गुहा होती. त्या गुहेत माँजींबरोबर सकाळी व संध्याकाळी पूर्णतः खाजगी संवाद. माँजींनी सांगितले की मी अजून १५ दिवस तरी नियोजित व्यक्तीबरोबर तिबेटला जाऊ शकणार नाही. त्यानंतरच ठरेल की मी पुढचा प्रवास करायचा की नाही ते!

१३/०३/१८८५ - दामोदर परत कलकत्याला आले आणि तेथे १५

दिवस राहीले. पुढच्या काहीच सूचना मिळाल्या नाहीत. या १५ दिवसात ते कोणाकोणाला कोणकोणत्या प्रसंगात भेटले ह्याचे तारीखवार वर्णन डायरीत आहे.

३०/०३/१८८५ – Received telegram, through ...... from ...... तारेत संदेश होता की मी आता दार्जिलिंगला येऊ शकतो आणि तेथून पुढची सर्व व्यवस्था केली जाईल. दामोदर यांनी ३१ मार्चला कलकत्ता सोडले आणि १ एप्रिलला ते दार्जिलिंगला पोचले. तेथे त्यांचे स्वागत सोसायटीचे सदस्य बाबू छत्रधर घोष यांनी केले. दामोदरना ल्हासाला घेऊन जणारी व्यक्ती (personage) खूपच महत्वाची भूमिका बजावत होती. या व्यक्तीचा प्रतिनिधी तीन दिवसानी दामोदरना भेटायला आला. त्याने दामोदरना सांगितले की तुझा पुढचा प्रवास कोणत्याही क्षणी सुरू होऊ शकतो. तू जय्यत तयारीत रहा. पण त्याने निश्चित अशी तारीख सांगितली नाही. दामोदर आणि या व्यक्तीची अनेकदा भेट झाली आणि सर्व नियोजित गोष्टी सविस्तरपणे ठरल्या.

०८/०४/१८८५ – अखेर तिबेटकडे प्रयाण करण्याची आदेश आला आणि

१३/०४/१८८५ – आज सकाळी १०.१५ ला दार्जिलिंग सोडले. ११ मैलावरील रूंजीत येथे संध्याकाळी पोचलो. तेथे मुक्काम. (अर्थात हा सर्व प्रवास त्यांनी कोणत्या तरी व्यक्तीबरोबर केला पण या नावाचा उल्लेख दामोदर यांनी कुठेही केलेला नाही.)

१४/०४/१८८५ – सकाळी ७ ला रूंजीत सोडले आणि टासडिंग पुलाच्या पुढे अर्ध्या मैलावर भात घेतला (म्हणजे उपवास सोडला). संध्याकाळी ६ ला कालिंगपाँगच्या पुढे ४ मैलावरील वेच्चा येथे पोचलो. तेथे गाईंच्या गोठ्यात रात्रीचा मुक्काम केला.

१५/०४/१८८५ – सकाळी कॉफी घेऊन वेच्चा सोडले. पोडाँनला भात घेतला. तेथे बाबू उपेंद्रनाथ मुखोपाध्याय भेटले. संध्याकाळी रेनांगत येथे पोचलो. तेथून ....... चे कुली पोनीबरोबर परत फिरले.

१६/०४/१८८५ – कॉफी न घेता फक्त भातच घेतला. वाटेत कुठेही न थांबता संध्याकाळी ५ वाजता डिचब्रींगच्या १ मैल पुढे सानांगथायला पोचलो. डाकबंगल्यावर मुक्काम केला.

१७/०४/१८८५ – सानांगथाय भात खाऊन सोडले व संध्याकाळी ५ ला

भशिंगथांगला पोचलो.

१८/०४/१८८५ – भात खाऊन भशिंगथांग सोडले व ४ वाजता लाँगबूच्या पुढे ३ मैलावरील डिच्चू नदीच्या तीरावरील दुमराहला पोचलो.

१९/०४/१८८५ – सकाळी लवकर नदी पार करून पाच मैलाचा डोंगर चढून दुपारी सिक्कीमला पोचलो. ही सिक्कीमच्या राजाची राजधानी. ......... या व्यक्तीबरोबर थांबलो. (या व्यक्तीबरोबर दामोदरचा पुढचा प्रवास होणार होता.) दुपारी १ तास त्या व्यक्तीची भेट घेतली. त्यांनी विशेष असे काही सांगितले नाही. उद्या परत बोलणे होणार आहे पण त्याआधी रात्री परत त्यांच्याबरोबर बोलणे झाले. ते म्हणाले की माझा उद्देश, अंतिम हेतू कसा अमलात आणायचा याबद्दल मी उद्या खात्रीने काहीतरी सांगेन. ती व्यक्ती परवा सिक्कीम सोडणार आहे.

२०/०४/१८८५ – त्या व्यक्तीबरोबर अजून एक भेट व बोलणे झाले.

२१/०४/१८८५ – आज परत भेट झाली. मला लाँगबूला जायचे होते पण त्याने मला उद्यापर्यंत येथेच थांबायला सांगितले. उद्या त्यांच्याकडे थोडा मोकळा, फुरसतीचा वेळ मिळेल असे ते म्हणाले.

२२/०४/१८८५ – त्या व्यक्तीबरोबर सकाळी १० ला सिक्कीम सोडले व दुपारी लाँगबूच्या पुढे १ मैलावरील काबीला पोचलो. तेथे एक दिवस मुक्काम केला. ती व्यक्ती मला म्हणाली ''मी तुम्हाला अजून पूर्ण ओळखत नाही. परंतु पुढील एक-दोन महिन्यात माझ्याकरिता महत्वाचे कार्य योजलेले आहे. बहुतेक (most probably) मी तिबेटमध्ये तिबेटीयन लामा म्हणून पुनर्जन्म घेणार आहे. दामोदर लिहितात – The Karma is great.

२३/०४/१८८५ – सकाळी भात घेऊन माझ्या वस्तू व सामान कुलींबरोबर दार्जिलिंगला परत पाठवून दिले व मी एकट्याने काबी सोडले.

एच्.एस्.ओ. पुढे लिहितात – ''इथे दामोदरची डायरी संपते. It is the last written trace of this devoted, high-minded, enthusiastic young Brahmin, whose record since joining HPB and myself at Bombay is one of unbroken energy and unfastening zeal in the cause of huminity.

A noble heart never beat in a human breast and his departure was one of the hardes blows we ever received.''

दामोदर यांच्याबरोबर असलेल्या कुलींच्या प्रमुखाकडून काही महत्वाची

माहिती एच्.एस्.ओ. यांनी मिळवली. पोनी परत पाठवल्यावर दामोदरने पर्वताचे खडे चढ पायी चढायला सुरवात केली पण त्यांची ताकद लवकरच संपली आणि मग त्यांना कुलींनी आलटून पालटून पाठीवर नेले. दामोदरला आदेश आला की त्याने अजून दोन दिवस प्रवास करावा व नंतर जेथे आहे तेथे थांबून रहावे. याचे कारण म्हणजे दामोदरचा तिबेटियन अधिकाऱ्याबरोबरचा संपर्क व भेट ही अतिशय गुप्त ठेवायची होती. दामोदरची पुढील माणसाची भेट व भेटीचे ठिकाण गुप्त रहावे म्हणून कुलींना परत पाठवले गेले. दामोदरने घातलेल्या संन्याशाच्या कपड्यांशिवाय त्यांना आता कोणतेही इतर कपडे, खाण्याचा शिधा आणि इतर कोणत्याही सुविधेचे सामान इथून पुढे न्यायची परवानगी नव्हती. ते जास्तीत जास्त डझनभर चपात्या व न आंबवलेले पॅनकेक्स् बरोबर घेऊ शकत होते. दामोदरने एकट्याने अतिशय कष्टाने, प्रचंड वेदना सहन करत तिबेटच्या दिशेने पुढे चालायला सुरवात केली आणि वाटेवरील एका वळणावरून तो दिसेनासा झाला. कुलींना झालेले हे दामोदरचे अखेरचे दर्शन! परतताना कुलींना तो माणूस दिसला जो पुढे दामोदर बरोबर जाणार होता. नंतर दार्जिलींगच्या जमादाराला मिळालेल्या माहितीप्रमाणे दामोदर आणि नियोजित व्यक्तीची पुढे भेट झाली आणि तो काफिला पर्वतांमधून खिंडीकडे चालू लागला.

एच्.एस्.ओ. लिहीतात – ''दामोदरने त्याग केलेले कपडे बर्फात गावकऱ्यांना मिळाले हे सहज शक्य आहे. परंतु दामोदरचे बर्फात गोठलेले शव मिळाले हे खरे नाही. कदाचित मायेचा वापर करून असे मुद्दाम केले असण्याची शक्यताही खूप आहे. परंतु दामोदर हे त्यांच्या नियोचित स्थळी सुरक्षितरित्या पोचले व तेथे ते महात्म्यांच्या संरक्षणाखाली आहेत हे नक्की. सर्वसामान्यपणे त्यांचा कोणाशी, जगाशी संपर्क, संबंध नव्हता, डाक, तार किंवा दूतामार्फत त्यांच्याशी संपर्क शक्य नव्हता. जणूकाही टांगत्या बिछान्यावर ठेऊन दामोदरना समुद्रात सोडून दिले आहे अशा पद्धतीने ते पारंपारिक अर्थाने संपर्काच्या बाहेर गेले. या अर्थाने त्यांनी देह सोडला असे कदाचित म्हणता येईल परंतु यानंतरच्या काळात हिंदूस्थानातील दोन व्यक्तींना तीन वेळा दामोदरने पत्र लिहिले आहे. दामोदरांची पुढची बातमी एच्.एस्.ओ व इतर काही मर्यादित व्यक्तींना नक्की असणार कारण एच्.एस्.ओ. लिहीतात की ''दामोदरचे सध्याचे वसतीस्थान किंवा ते परत कधी येणार याबाबत मला अनेकदा अतिशय तातडीच्या विनंत्या

अनेक प्रकारे करण्यात आल्या पण प्रत्येक वेळेस मी याबाबत काहीही सांगण्यास नकार दिला.''

दामोदर परत येणार, कदाचित एच्.पी.बीं.चा वारसदार म्हणून आणि ओळखता येणार नाही अशा स्वरूपात व परिस्थितीत ते येणार याची एच्.एस्.ओ. ना पक्की खात्री होती. त्याचे कारण एच्.एस्.ओ. सांगतात – महान कर्मदेवता थिऑसॉफिकल चळवळीच्या कोणत्याही उत्तम कार्यकर्त्याला अस्तित्वाच्या इतर सूक्ष्म स्तरावर कृतिहीन, रिकामा ठेवतील अशी कल्पना करणे अतार्किक आहे. कारण जगाचा प्रकाश व मार्गदर्शनासाठी चाललेला आक्रोश अशा कार्यकर्त्याच्या सूक्ष्म कोशांपर्यंत सतत पोचत असतो. मानवजातीला उत्क्रांतीच्या मार्गाने उच्च स्तरावर – जेथे अज्ञानाचा अंधकार ज्ञानाच्या तेजस्वी ज्वालेने दूर होतो अशा ठिकाणी जाण्यासाठी मदत करणे ही अशा कार्यकर्त्याची मुख्य तीव्र इच्छा आणि सर्वश्रेष्ठ कर्तव्य असते.

या सगळ्या घटनांनंतर एच्.एस्.ओ. आणि टी. सुब्बाराव यांनी 'दी थिऑसॉफिस्ट' जुलै १८८६ च्या अंकात प्रथमच अधिकृत निवेदन देतात. ते असे – ''आपले बंधु दामोदर के. मावळणकर यांच्या नशीबात पुढे काय वाढून ठेवले आहे याबद्दल अस्वस्थ आणि चिंतेत असलेल्या अनेक मित्रांची चिंतेतून मुक्तता व्हावी आणि दामोदरच्या मृत्युबद्दलच्या अफवांचे निरसन व्हावे यासाठी आम्हाला सांगायला अत्यंत आनंद होत आहे की ७ जूनला (१८८६) आलेल्या खात्रीलायक वृत्तानुसार दामोदर त्याच्या इप्सित स्थळी सुखरूप पोचला आहे, तो जिवंत आहे आणि तेथे योग्य पालकत्वाखाली आहे. त्याच्या परत येण्याची तारीख अद्याप अनिश्चित आहे आणि बहुदा पुढील दीर्घ काळासाठी ती अनिश्चितच राहील.''

यानंतर १ वर्षाने म्हणजे जून १८८६ मध्ये दामोदर तिबेटला पोचल्यानंतर महात्मा कुथुमी एच्.एस्.ओ. यांना लिहीतात आणि दामोदरना तिबेटच्या प्रवासात इतका त्रास सहन करावा लागला याची काही कारणे देतात. मुळचे पत्र पुढीलप्रमाणे – "The poor boy has had his fall. Before he could stand in the presence of the 'Masters' he had to undergo the severest trials that a neophyte ever passed through, to atone for the many questionable doings in which he had over-zealously taken part, bringing disgrace upon the sacred science and its adepts. The mental and physical suffering was too much for his

weak frame but he will recover in course of time. This ought to be a warning to you all. To unlock the gates of the mystery you must not only lead a life of the strictest probity, but learn to discriminate truth from falsehood. You have talked a great deal about Karma but have hardly realised the true significance of that doctrine. The time is come when you must lay the foundation of that strict conduct - in the didividual as well as in the collective body - which ever wakeful, guards against conscious as well as unconscious deception."

२१/११/१८८९ च्या एन. डी. खंडालवाला यांना लिहिलेल्या एका पत्रात एच्.पी.बी. लिहितात – ''दामोदर अजून जिवंत आहे आणि हे मला व यांना एच्.एस्.ओ. माहीत आहे. दामोदरने मला २–३ महिन्यांपूर्वी पत्र लिहीले आहे.'' दुर्दैवाने जी पत्रे दामोदरने तिबेटहून लिहिली असे मानले जाते त्यातली कुठलीच आता उपलब्ध नाहीत. थिऑसॉफिकल चळवळीच्या सुरवातीच्या काळातील घटनांच्या ऐतिहासिक महत्वाबद्दल एच्.पी.बी. एवढ्या जागरूक नव्हत्या. इतरांनीसुद्धा असा पत्रव्यवहार हा पूर्णतः खाजगी आहे असे मानून ती पत्रे कालांतराने नष्ट केली तर काहींच्या नातेवाईकांकडून नंतर महत्वाची कागदपत्रे नष्ट झाली. या कागदपत्रांनी इतिहासात खूप मोलाची भर घातली असती.

जानेवारी ४ ते ६ १८८६ यादरम्यान एच्.पी.बीं.नी दामोदरला ॲस्ट्रली म्हणजेच सूक्ष्म स्तरावर पाहिले.

दामोदरच्या अनुपस्थितीत थिऑसॉफिकल नेत्यांच्या मनात काय काय चालू होते, ते कसा विचार करत होते, काय काय शक्यता त्यांच्या विचारचक्रात ठळकपणे होत्या हे सांगणारे अनेक प्रसंग याकाळात घडत होते.

१८८५ च्या दरम्यान एच्.पी.बी. खूप आजारी होत्या, त्यांची तब्येत खूपच नाजूक होती. ०९/०२/१८८५ रोजी फ्रांसिस्का अरूंडेल यांना लिहिलेल्या पत्रात एच्.एस्.ओ. म्हणतात – ''मला महात्म्यांचा आदेश आहे की जर दामोदर परत यायच्या आधी एच्.पी.बी. निजधामास गेल्या तर महात्मे व थिऑसॉफिकल सोसायटी यातील दुवा म्हणून दामोदर जी भूमिका पार पाडणार आहे तो दुवा मी बनावे.''

१८९१ साली एच्.पी.बी. निवर्तल्यावर बराच काळ एच्.एस्.ओ व महात्मे यांच्यात प्रत्यक्ष संपर्क नव्हता. त्याकाळात एच्.एस्.ओ यांचा विचार

व इच्छा होती की अध्यक्षपद आता डबल्यू. क्यू. जज यांच्याकडे सोपवावे पण बहुतेकजण याला राजी नव्हते. आणि अशा वेळी १०/०२/१८९२ ला एच्.एस्.ओ.ना दिव्य आवाजात (clairaudiently) एक महत्वाचा संदेश मिळाला. महात्म्यांकडून एक दूत येणार आहे आणि एच्.एस्.ओ नी स्वतःला तयार ठेवावे ज्यायोगे त्याच्या आगमनानंतर त्या दोघांची लगेच भेट होईल. याशिवाय असा दूत कधी येणार आणि त्याचे नाव इत्यादीबद्दल काहीच कळले नाही. अचूक माहिती अभावी एच्.एस्.ओ यांनी घाईघाईने निष्कर्ष काढला की बहुतेक दामोदरच परत येणार. साधारण ७ वर्षांचा उमेदवारीचा काळ संपवून तोच येणार. यानंतर सुमारे दीड वर्षापर्यंत एच्.एस्.ओ यांनी एक बॅग सतत भरून तयार ठेवली होती ज्यायोगे क्षणाचाही विलंब न करता दार्जिलिंगला जाता येईल. पण प्रत्याक्षात तसे काहीच घडले नाही.यासंदर्भात असा एक मतप्रवाह आहे की या संदेशाप्रमाणे येणारा दूत म्हणजे ॲनी बेझंट होत्या.

एच्.पी.बीं.नंतर थिऑसॉफिकल सोसायटीच्या रेकॉर्डिंग सेक्रेटरीच्या नियुक्तीसाठी खूप शोध घेतला गेला. त्यावेळेस एच्.एस्.ओ म्हणाले की आम्हाला दुसऱ्या दामोदरची नितांत गरज आहे.

एप्रिल १८९० मध्ये एच्.पी.बी. इंग्लंडहून आपल्या आर्यावर्तातील बांधवांसाठी लिहीतात – ''महत्वाची गोष्ट म्हणजे थिऑसॉफिकल सोसायटीमुळे तुमच्यापैकी किमान एकाचा पूर्ण फायदा झाला आहे. सोसायटीने भारताला इतर काही दिले असेल किंवा नसेल पण भविष्यातील एक महात्मा दिला आहे. दामोदर एक दिवस महात्मा बनणार ही खात्रीलायक आशा आहे. ही एकच बाब पुरेसा दाखला आहे की थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना न्युयॉर्कमध्ये होऊन ती भारतात आली हा निव्वळ योगायोग नाही तर तो एका योजनेचाच भाग आहे.''

सप्टेंबर १८९२ च्या 'दी थिऑसॉफिस्ट' च्या अंकात 'A Faithful Servant Gone' या मथळ्याखाली एक बातमी दिली होती. (ही बातमी दामोदरविषयी नसून दामोदरने भेट दिलेल्या उमद्या घोड्याबद्दल होती.)

दामोदर परत येईल याबद्दलची शेवटची आशा १९०९ मध्ये व्यक्त केली गेली आणि त्यावेळी दामोदरच्या अनेक लेखांचे पुर्नमुद्रण 'दी थिऑसॉफिस्ट' मध्ये केले गेले.

थिऑसॉफिकल चळवळीत दामोदरचे योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.

त्याचे सातत्यपूर्ण कष्टदायक कार्य, सोसायटी लढत असलेल्या लढाईमध्ये बुद्धिप्रामाण्य सहभाग आणि आपणा सर्वांसाठी सर्वात महत्वाचे योगदान म्हणजे थिऑसॉफिकल तत्वप्रणालीवर आधारित आचरण कसे असावे याचे उत्तम प्रमाण दामोदरने जगाला दिले.

सुमारे ७० ज्येष्ठ थिऑसॉफिस्टनी त्याकाळात महात्म्यांचे स्वीकृत शिष्य बनण्यासाठी उमेदवारीचे प्रयत्न केले. त्यापैकी पूर्ण यश मिळालेला एकच – दामोदर. महात्म्यांना प्रत्यक्ष पहाण्याच्या, भेटण्याच्या इच्छेपोटी अनेकानी शिष्यत्वासाठी नेटाने प्रयत्न केले परंतु एकेक करून जेव्हा त्यांनी चळवळीसाठी, मानवतेसाठी आवश्यक असलेल्या निरपेक्ष सेवावृत्तीपेक्षा स्वतःचे व्यक्तिमत्व, त्यातले वैयक्तिक गुणदोष, स्वभाववैचित्र्य यांना जास्त जागा करून दिली तेव्हा ते अयशस्वी ठरले.

थिऑसॉफिकल सोसायटीच्या इमारतीच्या पायाच्या शीलेवर दामोदरचे नाव ठळकपणे कायम कोरले गेले आहे. या इमारतीची रचना कालपरत्वे कदाचित बदलेल, प्रत्येक पिढी त्यात स्वतःची भर घालेल पण दामोदरसारख्या अग्रणी धुरिणांनी जो भक्कम पाया रचला आहे तो सदैव तसाच राहील. चळवळीमध्ये अनकेदा चढ–उतार येतील पण फिनीक्स् पक्षाप्रमाणे प्रत्येक वेळी राखेतून भरारी घेण्याचे बळ या पायामधून मिळेल आणि आशा–निराशेच्या लाटांमधूनच "There is no Religion Higher than TRUTH" चे पुनरुत्थान होईल.

(क्रमशः)

---

## कर्मफल–चिंतन

१) ''**व्यक्ती 'ब' ने एखादे कार्य स्वतःहून पुढाकार घेऊन करणे**'' आणि

२) ''**तेच कार्य व्यक्ती 'अ' ने सांगणे आणि व्यक्ती 'ब' ने ते करणे**''

या दोन्ही प्रसंगात व्यक्ती 'ब' ने प्रत्यक्ष केलेले कार्य एकच आहे पण व्यक्ती 'ब' ला मिळणारे फळ या दोन्ही प्रसंगात वेगवेगळे असेल.

पहिल्या प्रसंगात 'ब' ला **कार्यशृंखला सुरू करण्याचे आणि प्रत्यक्ष कार्याचे अशी दोन्ही फळे** मिळतील.

तर दुसऱ्या प्रसंगात 'अ' ला कार्यशृंखला सुरू करण्याचे फळ मिळेल आणि 'ब' ला फक्त ''**कोणतेही कार्य आज्ञाधारकपणे करण्याची सदैव तयारी**'' याचे जे फळ असेल तेवढेच मिळेल.

# जे. कृष्णमूर्ती, थिऑसॉफी आणि थिऑसॉफिकल सोसायटी

**अर्जेंटिनातील सन राफेल थिऑसॉफिकल केंद्राच्या तरूण सदस्यांच्या प्रश्नांना श्रीमति राधा बर्नियें यांनी दिलेली उत्तरे (एप्रिल २००४)**

**अनुवाद – बंधु डॉ. विनायक मिराशी**

**(पुर्नमुद्रित)**

**(हा संवाद प्रश्नोत्तर स्वरूपात होता. प्रश्न १ आणि त्याचे उत्तर खूप प्रदीर्घ असल्याने ते पुढील अंकात छापण्यात येईल. – संपादक)**

**प्रश्न २ : कृष्णमूर्ती थिऑसॉफिकल सोसायटीच्या संपर्कात राहिले होते का?**

उत्तर : त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटी सोडल्यानंतर ते थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये गोंधळ निर्माण करतील असे काही मंडळींना वाटले होते. परंतु काही मंडळींना चिंतनीय आणि महत्वाचे वाटत होते. त्यांच्यामुळेच पुढील काळात कृष्णजी थिऑसॉफिकल सोसायटीच्या संपर्कात येण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाले होते. श्री. जिनराजदास त्यांच्याशी अत्यंत चांगले वागत असत असे कृष्णजींनीच मला सांगितले होते. कृष्णजी जिनराजदास यांना ''राजा'' म्हणत असत. बंधू ''राजा'' यांचे चाकोरीबद्ध विचार आणि कृष्णजींची नव्या पद्धतीची मांडणी यांचा मेळ बसत नसे. दोन्हीमध्ये सहमती होत नसे. परंतु राजाला कृष्णजींच्याविषयी ओढ होती. राजा त्यांना पुस्तके आणि अन्य वस्तू देत असे. ही हकीकत कृष्णजींनीच मला सांगितली होती. त्याकाळी कृष्णजी फारसे प्रसिद्ध नव्हते. ज्यावेळी माझे पिताजी (एन्. श्रीराम) थिऑसॉफिकल सोसायटीचे अध्यक्ष झाले त्यावेळी त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटीमध्ये कौशल्यपूर्ण रीतीने बदल घडवून आणले. त्यामुळे थिऑसॉफिकल सोसायटीच्या सदस्यांनी कृष्णमूर्तींचे बोलणे समजून घेण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाले होते.

★★★

# लॉज वार्ता

**◆ म. थि. फे. कार्यकर्ता वृत्तांत –**

१) बंधु ॲड. संजय पोटे आणि बंधु अरूण पालकृत यांनी दि. २६/११/२०१९ रोजी धंतोली लॉज, मैत्रेय लॉज, नागपूर व दि. २८/११/२०१९ रोजी अकोला लॉज येथे सदिच्छा भेट देऊन उपस्थित सभासद व पदाधिकारी यांच्यात संवाद साधून अडीअडचणी समजावून घेतल्या. ॲड. संजय पोटे यांनी दि. २५/११/२०१९ रोजी अकोट लॉजला भेट दिली व उपस्थित सभासदांबरोबर हितगुज करून अडीअडचणी समजावून घेतल्या व सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी प्रोत्साहन दिले. यात सर्व सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

२) भारत समाज पूजेची जनमानसात ओळख व्हावी या उद्देशाने इंद्रप्रस्थ गृह. संस्था, नवी सांगवी येथे नवीन प्रयोग करण्यात आला. पूना लॉजचे सभासद अरूण पालकृत यांच्या इंद्रप्रस्थ संस्थेतील आयोजित कार्यक्रमात ही भारत समाज पूजा दि. २३/११/२०१९ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आली. बंधु कौस्तुभ भडभडे यांनी पूजेचा विधी आणि विस्तृत माहिती सहभागी सभासदांना करून दिली. पूना लॉजचे बंधु तेंडूलकर, बंधु प्रकाश साठे, भगिनी माया जाधव, भगिनी मृणाल जोशी आणि बंधु अरूण पालकृत सहभागी झाले होते.

३) म. थि. फे. चे अध्यक्ष ॲड. संजय पोटे यांना दि. २५/११/२०१९ रोजी ''ग्लोबल अचिव्हमेंट ॲवॉर्ड'' ने ग्वाल्हेर येथे गौरवण्यात आले. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व त्यांना खूप शुभेच्छा.

**◆ दी अकोला थिऑसॉफिकल लॉज, अकोला –**

अकोला थिऑसॉफिकल लॉजची स्थापना दि. १३/१२/१९०१ ला झाली. यावर्षी या शाखेला ११८ वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त दि. १२/१२/२०१९ रोजी रविवारी सकाळी ९.३० ला प्रा. नाना भडके, संगीत विभाग, सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला व समूह यांचा भक्तिसंगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर सहभोजन झाले. या कार्यक्रमादरम्यान अकोट थिऑसॉफिकल लॉजच्या उपाध्यक्षा भगिनी शालिनीताई पोटे, अकोला लॉजच्या अध्यक्षा भगिनी पुष्पाताई हागे पाटील, अकोला लॉजचे व म. थि. फे. चे माजी अध्यक्ष बंधु नंदकुमार राऊत तसेच अमरावती येथील प्रिती वर्मा इत्यादिंचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. गायक प्रा. नाना भडके यांनी उत्कृष्ट भक्तीगीते सादर केली.

◆ **दी अकोट थिऑसॉफिकल लॉज, अकोट –**

अकोट थिऑसॉफिकल लॉजच्या वतीने प्रदिप महापात्रा व भगिनी मितालिनी महापात्रा, भुवनेश्वर यांचे अकोट लॉज येथे दि. १३/११/२०१९ ला आगमन झाले, नंतर त्यांनी दि. १४/११/२०१९ ला सकाळी अकोट लॉजच्या नवीन इमारतीची पहाणी केली व ठीक ११ वाजता बालदिनी त्यांचे ''आत्मा आणि चैतन्य'' या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी बाळासाहेब आसरकर, शालिनीताई पोटे, नलीनीताई ठगेकर, मीनाताई फोकमारे, तृप्ती पालखेड, रविकांत पालखेड उपस्थित होते. याशिवाय सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

◆ **दी अमरावती थिऑसॉफिकल लॉज, अमरावती** – टी. ओ. एस्. गटातर्फे गाडगेबाबा वृद्धाश्रम, वळगाव येथे वृद्धांसाठी हवन आणि भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. उपस्थितांनी आनंद व समाधान याचा अनुभव घेतला.

◆ दी **डोंबिवली थिऑसॉफिकल लॉज, डोंबिवली –**

दि. २२/१२/२०१९ डोंबिवली थिऑसॉफिकल लॉजतर्फे लॉजचे अध्यक्ष बंधू जितेंद्र ठाकूर यांच्या घरी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पुणे लॉजचे सभासद व विभागीय व्याख्याते बंधू नितीन अभ्यंकर यांनी ''**परमेश्वर प्राप्तीचा सुवर्णसोपान**'' (गोल्डन स्टेअर्स) या विषयावर उत्तम व्याख्यान दिले आणि ''**मराठी फेडरेशनकडून राबवण्यात येणारे उपक्रम**'' याविषयी माहिती दिली व काही सूचनाही केल्या. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

१) पुणे लॉजचे बंधू भडभडे हे ''भारत समाज पूजा'' कशी करायची हे प्रत्यक्ष शिकवणार आहेत. इच्छुकांनी त्यांच्याशी संपर्क साधावा. ते स्वतः येऊन शिकवतील.

२) संस्थेची (इंडियन सेक्शन) आजीवन सभासद फी रु. ३०००/- करण्यात आलेली आहे.

३) प्रत्येक लॉजने आपल्या सभासदांची वार्षिक वर्गणी त्या आर्थिक वर्षात ३१ जुलैच्या आधी फेडरेशनकडे जमा करावी.

४) एखाद्या सभासदाने अनेक वर्षे वार्षिक वर्गणी दिलेली नसेल आणि तो पुन्हा सभासद होऊ इच्छित असेल तर मागील दोन वर्षांची व चालू वर्षाची वर्गणी एकत्रित भरून त्याला पुन्हा सभासद करून घेता येऊ शकते. लॉजच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधावा व अशा जास्तीत जास्त सभासदांची

मेंबरशीप सक्रीय करण्याचा प्रयत्न करावा.

५) प्रत्येक लॉजच्या प्रत्येक सभासदाने त्याच्या अंगी काय कौशल्य आहे ते फेडरेशनला कळवल्यास फेडरेशनला त्या सद्गुणांचा उपयोग करून घेता येईल.

६) प्रत्येक लॉजने राबवलेल्या उपक्रमांची माहिती त्यांच्या फोटोसह कळवल्यास ती प्रकाशित केल्यावर इतरांना प्रेरणादायी ठरू शकते.

**७) प्रत्येक लॉजने एक प्रतिनिधी नेमून फेडरेशनला कळवावा म्हणजे 'विश्वबंधुत्व' मासिकाच्या कॉपीज त्याच्या पत्त्यावर पाठवून त्यांचे वितरण करणे सोयीचे व कमी खर्चाचे होईल आणि एकंदरीत विश्वबंधुत्वच्या कामास हातभार लागेल. विश्वबंधुत्त्व मासिकासाठी पाठवण्यात येणारे लेख व काव्य यात केवळ थिऑसॉफी संबंधीत विषयाचाच अंतर्भाव असावा.**

८) लॉजच्या सभेची बैठक साधारपणे एक तासापेक्षा जास्त नसावी. तिच्या अंती 'वैश्विक प्रार्थना' (ओ हिडन लाईफ) सर्वांनी एकत्र म्हणावी.

९) फेडरेशनकडून आयोजित करण्यात येणाऱ्या अभ्यासवर्गाला उपस्थित राहण्याचा प्रयत्न करावा व प्रत्येक लॉजने आपल्या कार्याची उद्दिष्ट्ये निश्चित करून ती सिद्धीस न्यावीत.

१०) प्रत्येक थिऑसॉफिकल लॉजतर्फे खालील महत्वाचे दिवस (रेड लेटर डेज) साजरे करावेत.

१. **१७ फेब्रुवारी – अड्यार डे –** यादिवशी अ) लिऑर्डानो ब्रुनो (हौतात्म्य १६००), ब) सी. डब्ल्यु. लेडबीटर (जन्मदिन १८४७), क) कर्नल ऑलकॉट (मृत्युदिन १९०७), ड) जे कृष्णमूर्ती (मृत्यूदिन १९८६) यांचे स्मरण करावे व या प्रत्येकाविषयी सुमारे १० मिनीटे सदस्यांनी बोलावे. यांचे जीवन, कार्य, शिकवण याचा भाषणात समावेश असावा.

२. **८ मे – व्हाईट लोटस् डे –** एच्. पी. ब्लॅव्हॅट्स्की (मृत्यूदिन १८९१) यांच्या जीवन, कार्य, योगदान, त्यांची ग्रंथसंपदा याविषयी बोलावे. लाईट ऑफ एशिया १-२ पाने, भगवद्गीता १ अध्याय वा १०-१२ श्लोक आणि व्हॉईस ऑफ सायलेन्स पुस्तकातील १-२ पाने वाचावी. अन्नदान करावे.

३. **१ ऑक्टोबर – ॲनी बेझंट डे** (जन्मदिन १८४७) – ॲनी बेझंट यांचे चरित्र, कार्य व शिकवण, त्यांची ग्रंथसंपदा याविषयी बोलावे.

४. **७ ऑक्टोबर** – डोंबिवली लॉज वर्धापन दिवस (स्थापना१९७७)

– चार्टर नं. १२७४, सभासद – डि. एन्. दाते, ए. डी. घैसास, के. आर. कोडियाल, ए. एस्. भुर्के, व्ही. डी. जाधव, सी. ए. भोसेकर आणि एम्. एस्. साने. विविध सदस्यांनी लॉजचा इतिहास, आपला लॉजशी आणि थिऑसॉफीशी कसा संबंध आला, आपल्यात काय परिवर्तन घडले, पुढील कार्य याविषयी बोलणे. स्नेहभोजन करणे. (प्रत्येक लॉजने आपला वर्धापनदिन साधारणपणे या पद्धतीने साजरा करावा.)

५. **११ नोव्हेंबर – थिऑसॉफिकल सोसायटी वर्धापन दिवस** (स्थापना १८७५, न्यूयॉर्क) – संस्था, तिची उद्दिष्ट्ये, कार्य यांच्याविषयी बोलावे. याशिवाय संस्थेचे संस्थापक मॅडम ब्लॅव्हॅट्स्की व कर्नल ऑलकॉट यांच्याविषयी बोलावे.

**६. एको– कन्व्हेन्शन – ३१ डिसेंबर ते ५ जानेवारी** या कालावधीत संस्थेचे जे आंतरराष्ट्रीय अधिवेशन होते त्या अधिवेशनाला मौन पाळून शांतचित्ताने शुभेच्छा देऊन तेथील शुभविचारांची व संस्कारांची स्पंदने आपल्याला प्राप्त व्हावीत म्हणून ध्यानयुक्त प्रार्थना करावी. त्या अधिवेशनाचे जे मुख्य सूत्र (थिम) असेल त्यावर चर्चा करावी.

(टीप – उपरोक्त ५ दिवस साजरे करताना वर्षातून १–२ वेळा लॉजच्या निमंत्रणावरून बंधू नितीन अभ्यंकर यांनी स्वतः येऊन मार्गदर्शन व व्याख्यान देण्याची तयारी दर्शविली आहे.)

◆ **दी पूना लॉज, पुणे** –

१) ''**थिऑसॉफी आणि त्यामागील भावना**'' या विषयावर दि. १५ ते १७ नोव्हेंबर २०१९ असा तीन दिवसाचा अभ्यासवर्ग पूना लॉज येथे संपन्न झाला. साधारण २० ते २५ सभासदांनी यात उत्स्फूर्त भाग घेतला. बंधु प्रदिप महापात्रा व भगिनी मितालिनी महापात्रा, भुवनेश्वर आणि बंधु बी. डी. तेंडूलकर, पुणे हे अभ्यासवर्गाचे सहभागी वक्ते होते.

२) १७ नोव्हेंबर – थिऑसॉफीकल सोसायटीच्या स्थापनादिनाचे औचित्य साधून म. थि. फे. तर्फे ''ई–विश्वबंधुत्व'' या द्वैमासिकच्या – म. थि. फे. च्या मुखपत्राच्या प्रथम आवृत्तीचे अनावरण आणि प्रसारण करण्यात आले. अंकाच्या निर्मीतीचे काम नितीन व नीला अभ्यंकर, पुणे यांनी पाहिले. यापुढे हे द्वैमासिक नियमीत स्वरूपात होणार आहे. याप्रसंगी बंधु प्रदिप महापात्रा व भगिनी मितालिनी महापात्रा, भुवनेश्वर, बंधु एच. एस्, वैद्य, पुणे, पुणे महानगरपालीका

स्थापत्य अभियंता बंधु भुतकर हे सहभागी वक्ते होते.

३) नेहमीप्रमाणे प्रत्येक रविवारी सकाळी ९.३० ला भारत समाज पूजा तर त्यानंतर एका धर्माची प्रार्थना व ओंकार उच्चारण झाले. त्यानंतर व्याधीनिवारण विधी झाला. तसेच प्रत्येक रविवारी सकाळी १०.३० ला व्याख्याने झाली. यात नोव्हेंबर आणि डिसेंबर २०१९ या काळात 'Thought Power - It's control and culture' या ॲनी बेझंट यांच्या पुस्तकाचे अध्ययन बंधु बरसे यांनी घेतले; बंधु शरद वैद्य यांनी 'Theosophy Science Meet' घेतली; बंधु नितीन अभ्यंकर यांनी ''दामोदर व थिऑसॉफिकल चळवळ'' या विषयावरील व्याख्यानमालेतील पुढचे सत्र घेतले आणि बंधु तेंडूलकर यांनी ''सत्यान्नास्ति परोधर्मः'' या विषयावर मार्गदर्शन केले.

४) दर मंगळवारी व शुक्रवारी बंधु शशांक बुरसे यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी ४ ते ५ या वेळेत 'The Secret Doctrine' या ग्रंथाचे तर ५ ते ६ यावेळेत 'The Mahatma Letters' या ग्रंथाचे अध्ययन केले जाते.

५) रोज ४ ते ६ लॉजचे ग्रंथालय चालू असते. लॉजमध्ये थिऑसॉफीवरील मराठी व इंग्रजी पुस्तके विक्रीला उपलब्ध आहेत. या दोन्हीची जबाबदारी सध्या बंधु गांधी आणि भगिनी माया जाधव पहातात.

६) पूना लॉजमध्ये बरीच मोकळी जागा आहे. जोराचा पाऊस झाला की तेथे पाणी साठते आणि जाणे येणे अवघड बनते. त्यावर अनेक उपाय याआधी करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून पुढील बाजूची सर्व मोकळी जागा सपाट करून त्यावर डबर, मुरूम, माती इत्यादि पसरून रोलरने ती समतल करण्यात आली. हा प्रयोग किती यशस्वी होईल ते येत्या पावसाळ्यात कळेल. याकामी बंधु अरूण पालकृत यांचे बहुमुल्य योगदान विशेष उल्लेखनीय आहे. याशिवाय थोडे फार इतरही देखभालीचे काम पण करण्यात आले.

◆ **दी सांगली लॉज, पुणे** –

१७/११/२०१९ रोजी सांगली लॉजमध्ये थिऑसॉफीकल सोसायटीचा स्थापनादिवस साजरा करण्यात आला. १७ सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते. बंधु आर. सी. माळी अध्यक्षस्थानी होते तर बंधु प्रा. सी. एस्. मिरजकर आणि बंधु डी. एन. कारखानीस यांनी ''**थिऑसॉफीकल सोसायटीची स्थापना कशी झाली, या सोसायटीचे महत्व**'' यावर मार्गदर्शन केले. सचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले. ★★★

# दी थिऑसॉफिकल सोसायटी

मुख्य कार्यालय : अड्यार (चेन्नई) ६०० ०२०.
e-mail : secy.hq@ts-adyar.org
website : www.ts-adyar.org

**आंतरराष्ट्रीय अध्यक्ष** : बंधु टीम बॉईड, अड्यार, चेन्नई.

## भारतीय शाखा

**कार्यालय** : थिऑसॉफिकल सोसायटी, कामाच्छा, वाराणसी - २२१ ०१०.
फोन : (०५४२) २४५०७७६, २४००७७३
e-mail : theosophyvns@gmail.co
website : www.theosophy-india.org

**महासचिव** : श्री. प्रदिप गोहील **कोषाध्यक्ष** : बंधु व्ही. नारायणन

## मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनची कार्यकारिणी

**अध्यक्ष** : ॲड. संजय दि. पोटे
२, चिंतामणी अपार्टमेंटस्, प्लॉट नं ७२, उजवी भुसारी कॉलनी,
कोथरूड, पुणे ४४००१०. मोबाईल नं. : ७७४४९१०७८७

**उपाध्यक्ष** : बंधु प्रा. आर. सी. माळी
सांगली ४११००४. मो. नं. : ९९२२२३१७८८

**सचिव** : बंधु अरूण मा. पालकृत
इंद्रप्रस्थ, ए१/११, साई चौकाजवळ, न्यू सांगवी, पुणे ४११०६१.
फोन : ९४२२०३६७०२

**कोषाध्यक्ष** : बंधु कौस्तुभ भडभडे
पुणे ४११००४. मो. नं.: ९६२३४४८२४३

**उपसचिव** : भगिनी प्रवीणा शाह, खामगाव.

**कार्यकारिणी सदस्य** : बंधु जे. के. जाधव बेळगाव, बंधु डी. एस. कारखानीस सांगली, बंधु ए. पी. लोखंडे नागपूर, बंधु एस. के. विसाळ मालेगाव, भगिनी एस. एन. मेहेत्रे नागपूर, बंधु ॲड. एन. डी. राऊत अमरावती, बंधु डॉ. ए. एस. सोनोने अकोला, बंधु एन. एन. राऊत अकोला, बंधु प्रा. एन. डी. अभ्यंकर पुणे (आमंत्रित), बंधु प्रा. सी. ए. शिंदे अड्यार, चेन्नई (इंडियन कॉन्सिल रिप्रेझेंटेटिव्ह.)

**विश्वबंधुत्व संपादक मंडळ** : बंधु नितीन अभ्यंकर, बंधु शशांक बुरसे,
बंधु ए. एस. सोनोने, भगिनी नीला अभ्यंकर.

### फेडरेशन कार्यालय : मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

द्वारा : पूना लॉज, ९१८ शिवाजीनगर, गणेशवाडी, बी.एम्.सी.सी.रोड, पुणे ४११ ००४.
फोन : ०२०-५६७ ०४१८

# थिऑसॉफिकल सोसायटी

## तीन उद्दिष्टे

१. जात, धर्म, लिंग व वर्ण हे भेद न करता मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जिवंत केंद्र बनविणे.

२. तौलनिक धर्म, तत्वज्ञान, विज्ञान यांच्या अध्ययनास उत्तेजन देणे.

३. अनाकलनीय सृष्टिनियम व मानवातील सुप्त शक्तींचे संशोधन करणे.

## तीन महान सत्ये

१. माणसाचा आत्मा अमर आहे, त्याच्या विकासाला आणि वैभवाला सीमा नाही.

२. जे तत्व जीवन देते, ते आपल्या आत तसेच बाहेरही वास करते. ते अमर व सदा कल्याणकारी आहे. ते ना ऐकू येते, ना दिसते, ना हुंगता येते; पण ते जाणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मनुष्याला अनुभवगम्य आहे.

३. प्रत्येक माणूस स्वत:च स्वत:चा एकमेव शास्ता आहे. स्वत:ला प्रकाशात किंवा अंध:कारात ठेवणारा तोच, जीवन, पुरस्कार, शिक्षा हे त्याचे हुकुम.

## विचार स्वातंत्र्य

थिऑसॉफिकल सोसायटी जगात दूरदूर फोफावली आहे. सर्व धर्मांचे अनुयायी, आपआपले धार्मिक सिद्धांत, शिकवण व श्रद्धा यांचा त्याग न करता सोसायटीचे सभासद झाले आहे व होत आहेत. म्हणून आता हितावह (desirable) हे आहे की सर्वांना हे पक्के माहित असायला हवे की असे कोणतेही सत्य वा सिद्धांत किंवा मत नाही, मग ते कोणीही सांगितलेले अथवा शिकवलेले असो; जे सोसायटीच्या कोणत्याही सभासदावर बंधनकारक असू शकेल. सोसायटीच्या सभासदाने ते मान्य करावे किंवा नाही याचे त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणाही टीचरला किंवा लेखकाला एच्. पी. ब्लॅव्हॅटस्की बाईंपासून ते आजपर्यंत आपले मत व उपदेश, शिकवण सभासदावर लादण्याचा अधिकार नाही. कोणत्याही विचार प्रवाहाबरोबर जाण्याचा, विचार-पंथाचा स्वीकार करण्याचा हक्क त्याला आहे, पण त्याचबरोबर आपली पसंती इतरांवर त्याला लादता येणार नाही. सभासदाचा त्याच्या वैयक्तिक मतामुळे मतदानाचा हक्क आणि निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क काढून घेता येणार नाही. मते अथवा श्रद्धा यांमुळे काही विशेष अधिकार मिळणार नाही किंवा शिक्षाही होणार नाही. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सर्व सभासदांना जनरल कौन्सिलची कळकळीची विनंती आहे की, त्यांनी सोसायटीच्या या मूलभूत तत्वांचा आदर करून त्यांना अबाधित राखावे, त्यांचे संरक्षण करावे व त्याबरहुकुम आचरण करावे, सौजन्य बाळगून व इतरांची कदर करून निर्भयपणे मतप्रदर्शन व प्रगटीकरणाचा हक्क गाजवावा.

---

**संपर्क : 'विश्वबंधुत्व' – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**
९१८, शिवाजीनगर, गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४.
दूरध्वनी:(०२०) ५६७०४१८

**Periodical Vishva Bandhutva**

**Reg. No. MAHMAR / 2003 / 7740**

# Printed Books

To,

From :
**Secretary,**
Marathi Theosophical Federation
C/O - The Poona Lodge, Theosophical Society
918, Shivajinagar, Ganeshwadi,
Deccan Gymkhana, Pune 411004.